सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १११ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १० जून २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४


# मुंबई, पुणे महापौर कार्यालय अन् RSS मुख्यालय उडवून देऊ

## खलिस्तान नॅशनल आर्मीच्या नावाने धमकीचे ईमेल

### अहमदाबाद, गांधीनगरमध्येही दिला इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०पुणे-** मुंबई-पुण्याचे महापौर कार्यालय आणि नागपूरमधील संघ मुख्यालय आयईडी बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्याने खळबळ उडाली आहे. दुसरीकडे अहमदाबाद आणि गांधीनगरमध्ये आज १० जून ते २० सप्टेंबर दरम्यान वेगवेगळ्या ठिकाणी बॉम्बस्फोट घडवण्याच्या गंभीर धमकीचे ईमेल मिळावलेत. खालिस्तान नॅशनल आर्मीच्या नावाने ही धमकी देण्यात आली आहे. त्यामुळे संवेदनशील भागांत सुरक्षा कडक करण्यात आली आहे. पोलिसांनी नागरिकांना शांततेचे आवाहन केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पाठवण्यात आलेल्या या धमकीच्या ई-मेलमध्ये केवळ मुंबई-पुणे महापौर कार्यालयच नव्हे, तर नागपूरमधील काही संवेदनशील ठिकाणे आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय देखील लक्ष्य करण्याची धमकी देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या धमकीमध्ये आयईडी बॉम्बस्फोटाचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला असून, हा घातपात घडवून आणण्यासाठी काही विशिष्ट वेळा आणि तारखांचाही संशयास्पद संदर्भ या ई-मेलमध्ये देण्यात आला आहे.

**■ कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही**

तपास यंत्रणांनी दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंतच्या कसून तपासणीमध्ये संबंधित परिसरात कोणतीही संशयास्पद वस्तू किंवा स्फोटक आढळून आलेले नाही. पोलिसांनी नागरिकांना शांततेचे आणि कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. तसेच, कोणतीही संशयास्पद वस्तू अथवा व्यक्ती आढळल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधण्यास सांगितले आहे.

**नेमके काय म्हटले ईमेलमध्ये**

या धमकीच्या ईमेलमध्ये अत्यंत पद्धतशीरपणे वेगवेगळ्या ठिकाणी बॉम्बस्फोट घडवून आणण्याच्या वेळा निश्चित करण्यात आल्या आहेत. यामध्ये पुण्याच्या महापौर कार्यालयात दुपारी १:११ वाजता, तर पुण्याचे विधान भवन आणि नागपूरमधील रेशीमबाग येथील आरएसएस मुख्यालय (डॉ. हेडगेवार भवन) येथे दुपारी ३:११ वाजता स्फोट घडवण्याचा इशारा देण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर, १० जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत पुणे आणि नागपूरमधील आरएसएसच्या विविध शाखांना सकाळी ६:११ ते रात्री ९:११ च्या दरम्यान लक्ष्य केले जाईल, असेही या पत्रात नमूद करण्यात आले आहे.धमकीमागील हेतू स्पष्ट करताना ईमेलमध्ये राजकीय आणि ऐतिहासिक घटनांचा संदर्भ देण्यात आला आहे. १९८४ मधील 'ऑपरेशन ब्लू स्टार' आणि 'ऑपरेशन वूडरोझ'ला आरएसएस आणि भाजपने पाठिंबा दिला होता, ज्यामध्ये २०,००० शीख तरुण मारले गेल्याचा दावा यात करण्यात आला आहे.

याच घटनेचा 'बदला' घेण्यासाठी आरएसएस आणि भाजप संपवण्याची करण्याची भाषा या ईमेलमध्ये वापरण्यात आली असून, हिंदूंनी आपल्या मुलांना वाचवावे, असा थेट इशारा वजा धमकीवजा संदेशही देण्यात आला आहे. या अत्यंत संवेदनशील ईमेलच्या शेवटी इंजि. गुरनाख सिंग, रुकन शाहवाला, डॉ. गुरनीवैंर सिंग आणि खान राजाडा अशा चार व्यक्तींच्या नावांचा उल्लेख करण्यात आला आहे.

**■ सुरक्षा यंत्रणांकडून कसून तपास सुरू**

धमकीचा हा ई-मेल मिळताच पुणे पोलिस, बॉम्ब शोधक व नाशक पथक तसेच सायबर विभाग तात्काळ सतर्क झाले आहेत. हा ई-मेल कोणत्या ठिकाणाहून आणि कोणत्या आयपी ड्रेसवरून पाठवण्यात आला, तो खरा आहे की केवळ दहशत निर्माण करण्यासाठी पाठवलेला बनावट ई-मेल आहे, याची तांत्रिक तपासणी सायबर विभागाकडून वेगाने केली जात आहे. खबरदारीचा उपाय म्हणून पुणे महापौर कार्यालय आणि नागपूरमधील इतर संवेदनशील परिसरात सुरक्षा आणि गस्त वाढवण्यात आली आहे.

## शाळा सुरू होण्याची तारीख २४ तासांत पुन्हा बदलली!

### आता ३०जून ला भरणार वर्गः कोर्टाचा आदेश

### काल रात्री काढलेल्या पत्रावर नागपूर खंडपीठाने ओढले ताशेरे

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१० नागपूर १९**

उन्हाळ्या सुट्ट्या संपत आल्या असून आता शाळा सुरू होणार आहेत. शिक्षण विभागाकडून शाळा सुरू होण्याच्या तारखा जाहीर करण्यात आल्या होत्या. मात्र आता शाळा सुरू करण्याचा निर्णय रद्द करण्यात आला आहे. दरम्यान १५ जूनपासून राज्यातील इतर जिल्ह्यात शाळा सुरू होणार आहेत. तर विदर्भातील २२ जूनपासून सुरू होणार होत्या. मात्र आता यावेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. शिक्षण संचालक यांनी काढलेले पत्र केले रद्द करण्यात आले आहे.




विदर्भातील शाळा १५ जूनऐवजी सोमवारी २२ जून रोजी सुरू करण्यात याव्यात असा आधी आदेश देण्यात आला होता. विदर्भातील शाळा २२ जून ते ३० जूनपर्यंत सकाळच्या सत्रात सुरू करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले होते. मात्र आता हा निर्णय बदलण्यात आला आहे. शिक्षण संचालक यांनी आधीच्या आदेश पत्र काढले होते, ते आता रद्द करण्यात आले आहे. शाळाच्या निर्णयाबाबत नागपूर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली होती. यावर निर्णय देताना नागपूर खंडपीठाने महत्वाचा निर्णय दिला असून २२ तारखेपासून सुरू होणाऱ्या शाळांच्या वेळेत बदल करण्यात आलेत. उन्हामुळे विदर्भातील शाळा ३० जूनपासून सुरु करण्याचा निर्णय आता घेण्यात आलाय.आजच्या सुनावणीत शिक्षण संचालक यांनी काल रात्री काढलेल्या पत्रावर नागपूर खंडपीठाने ताशेरे ओढले, तसेच २२ जूनला शाळा सुरू करण्याचा निर्णय चुकीचा असल्याची टिप्पणी केली. नागपूर खंडपीठ आणि सुप्रीम कोर्टाचे आदेश असताना अशा पद्धतीचा आदेश शिक्षण संचालकांनी का काढला असाही सवाल उपस्थित करण्यात आला आहे. राज्य सरकारकडून एक वाक्यता म्हणून एका दिवशी सगळ्या शाळा सुरू करण्याचा भूमिका सरकारी वकील आणि मांडली असता एक त्यात आणायचे आहे तर ते १५ जूनच का एक जुलै का नाही असा सवाल ही उपस्थित करत एक वाक्य वर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. त्यामुळे सिंचन शिक्षण संचालक यांनी काढलेले दोन्ही पत्र रद्द करत ३० जून पासून शाळा सुरू करण्याचे निर्देश दिले आहे. या निर्णयामुळे जवळपास २०००० शाळेतील लाखो विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दोन दिवसीय दिल्ली दौऱ्यावर:आज एनडीएची घटक पक्षांची बैठक

### उद्या नीती आयोगाच्या बैठकीलाही राहणार उपस्थित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०नवी दिल्ली -** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दोन दिवसीय दिल्ली दौऱ्यावर रवाना झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्र सरकारच्या नेतृत्वाची १२ वर्षे पूर्ण केल्याच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) घटक पक्षांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस दिल्लीत दाखल होत आहेत.

राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या बैठकीत केंद्र सरकारच्या गेल्या काही वर्षांतील कामगिरीचा आढावा घेण्यात येणार असून आगामी काळातील राजकीय आणि विकासात्मक धोरणांवरही चर्चा होण्याची शक्यता आहे. देशभरातील एनडीए शासित राज्यांचे मुख्यमंत्री, वरिष्ठ मंत्री आणि आघाडीतील प्रमुख नेते या बैठकीस उपस्थित राहणार आहेत.

**मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कामगिरीवर चर्चा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने १२ वर्षांचा टप्पा पूर्ण केल्याच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर होणाऱ्या एनडीए बैठकीत केंद्र सरकारच्या विविध योजनांचा, पायाभूत सुविधा विकासाचा, डिजिटल परिवर्तनाचा तसेच सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातील कामगिरीचा आढावा घेतला जाणार असल्याची माहिती आहे. याशिवाय आगामी निवडणुका, जनसंपर्क अभियान आणि केंद्र-राज्य समन्वय यांसारख्या विषयांवरही चर्चा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



**नीती आयोगाच्या बैठकीलाही उपस्थिती**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिल्ली दौऱ्यादरम्यान ११ जून रोजी होणाऱ्या नीती आयोगाच्या बैठकीतही सहभागी होणार आहेत. या बैठकीत देशातील विविध राज्यांच्या विकासाशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर चर्चा अपेक्षित आहे.

राज्यांच्या विकास आराखड्यांपासून ते पायाभूत सुविधा, कृषी, उद्योग, गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि शाश्वत विकास यांसारख्या मुद्द्यांवर या बैठकीत विचारविनिमय होणार आहे. महाराष्ट्राच्या विकासाशी संबंधित विविध प्रस्ताव आणि प्राधान्यक्रम मुख्यमंत्री फडणवीस या बैठकीत मांडण्याची शक्यता आहे.

**महाराष्ट्रासाठी महत्त्वाचा दौरा**


मुख्यमंत्री फडणवीस यांचा हा दिल्ली दौरा राजकीय आणि प्रशासकीय अशा दोन्ही दृष्टिकोनातून महत्त्वाचा मानला जात आहे. एकीकडे एनडीएच्या बैठकीत राष्ट्रीय राजकारणाच्या आगामी दिशा ठरणार आहेत, तर दुसरीकडे नीती आयोगाच्या बैठकीत महाराष्ट्राच्या विकास प्रकल्पांबाबत केंद्राशी समन्वय साधण्याची संधी राज्य सरकारला मिळणार आहे.त्यामुळे या दोन दिवसांच्या दौऱ्याकडे राज्यातील राजकीय वर्तुळासह प्रशासकीय यंत्रणेचेही लक्ष लागले आहे. मुख्यमंत्री दिल्लीतील बैठका पूर्ण करून पुढील दोन दिवसांत मुंबईत परतणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

## अमरावती विभागाला सर्वाधिक ८, तर संभाजीनगरला ५.९२ कोटींचा निधी

### आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांनाराज्य सरकारकडून २५ कोटींची मदत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०मुंबई १८**

नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा सततचा तगादा या दुष्टचक्रामुळे मृत्यूला कवटाळणाऱ्या राज्यातील अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतील शेतकरी कुटुंबांना राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. शेतकरी आत्महत्याप्रकरणी त्यांच्या वारसांना तातडीने आर्थिक मदत देण्यासाठी महसूल व वन विभागाने २५ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्याचा महत्त्वपूर्ण शासन निर्णय मंगळवार, ९ जून २०२६ रोजी जारी केला आहे.



या निधी वाटपात शेतकरी आत्महत्येचे सर्वाधिक चटके सहन करणाऱ्या अमरावती विभागाला सर्वाधिक ८ कोटी ७६ लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे. विभागीय आयुक्तांनी आपापल्या अंतर्गत येणाऱ्या जिल्ह्यांच्या मागणीनुसार हा निधी तत्काळ उपलब्ध करून द्यावा.

**देशात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात**

देशातील शेतकरी आत्महत्येपैकी ४० टक्के शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात होत आहेत. राज्यात दररोज सरासरी १७ आत्महत्या होत आहेत. गेल्या सात दिवसांत ११ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, तर पाच महिन्यांत ३१२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. यामागे शेतीतील वाढता खर्च, पिकाचा अनिश्चित व कमी भाव, कर्ज व लहरी हवामान ही कारणे आहेत.

**कोणाला किती निधी?**

अमरावती ८.७६ कोटी
संभाजीनगर ५.९२ कोटी
नागपूर ५. ७५ कोटी
नाशिक ३.३९ कोटी
पुणे १.०६ कोटी
कोकण १२.०० लाख

## 'त्यांची' नेहरुंच्या योगदानाशी कशी तुलना होऊ शकते

### पंतप्रधानपदाच्या विक्रमावरून शरद पवारांचा आसूड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०मुंबई :** नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदावर ४ हजार ३९९ दिवस पूर्ण करून दिवंगत पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा विक्रम मोडला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या या कार्यकाळाच्या विक्रमाबद्दल त्यांच्यावर एनडीए तसेच भाजपसमर्थकांकडून जोरदार कौतुक केले जात आहे. मात्र, यावरून ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. काही लोक 'यांच्यासारखा' नेता झाला नाही, हे सांगण्याचा प्रयत्न करत आहेत, या शब्दांत शरद पवार यांनी या दाव्याचा समाचार घेतला. तसेच यावेळी त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या योगदानाशी तुलना कशी होऊ शकते, असा सवालही केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वर्धापनदिनाच्या सोहळ्यात शरद पवार यांनी या निमित्ताने पंडित नेहरू, इंदिरा गांधी यांच्या कर्तृत्वाचा आढावा घेतला.

नरेंद्र मोदी यांनी २६ मे २०१४ रोजी पंतप्रधानपदाची शपथ घेतली तेव्हापासून ते सलग तिसऱ्यांना पंतप्रधानपदी आहेत. आता त्यांनी या पदावर ४ हजार ३९९ दिवस पूर्ण करून पंडित नेहरूंचा पंतप्रधानपदाचा विक्रम मोडला आहे. यावरून शरद पवार यांनी पक्षाच्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात



पंतप्रधान मोदींवर टिकेचा आसूड ओढला आहे. नरेंद्र मोदी यांची तुलना नेहरूंशी होऊ शकत नाही. पंडित नेहरूंचे योगदान खूप मोठे होते. त्यांनी शून्यातून भारत निर्माण केला आहे. त्यामुळे नेहरुंच्या योगदानाशी नरेंद्र मोदी यांची तुलना कशी होऊ शकते, असा सवाल त्यांनी केला आहे. पंडित जवाहरलाल नेहरू पंतप्रधान होण्याआधी देशाच्या स्वातंत्र्यासाठी इंग्रजांशी लढले होते. त्यांनी देश संघटीत करण्याचे काम केले. त्यांच्यामुळे देशात सुधारणेचे वारे वाहिले. त्यांच्यानंतर इंदिरा गांधी यांनीही तेवढ्याच निष्ठेने देशाची सेवा केली. इंदिरा गांधी यांनी देशाच्या प्रतिष्ठेशी कधीही तडजोड केली नाही. त्यांनी जगात देशाची प्रतिष्ठा सांभाळली, असे शरद पवार यांनी सांगितले.

## काँग्रेसमध्ये तृणमूल विलीन करण्याचा प्रस्ताव, ममता बॅनर्जींना उपाध्यक्षपदाची ऑफर, बंगालच्या राजकारणात सोनिया गांधींची एन्ट्री

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०नवी दिल्ली-** भाजपकडून टीएमसीवर होत असलेल्या राजकीय हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आपला पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करावा, अन्यथा भाजप 'आप'प्रमाणे त्यांना त्रास देईल, असा प्रस्ताव सोनिया गांधी यांनी ममता बॅनर्जी यांना प्रस्ताव दिला आहे.

पक्षातील लोकही अभिषेक बॅनर्जी यांच्या विरोधात आहेत, त्यामुळे सध्या त्यांच्यासाठी परिस्थिती कठीण झाली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनिया गांधी यांनी स्वतः त्यांना वैयक्तिकरित्या फोन केला होता. सूत्रांनी एबीपी न्यूजला असेही सांगितले की, ममता बॅनर्जी यांनी यावर निर्णय घेण्यासाठी काही दिवसांची मुदत मागितली आहे. सूत्रांच्या मते, त्यांना असा प्रस्ताव देण्यात आला आहे की, जर त्यांनी टीएमसीमध्ये विलीनीकरण केले, तर त्यांना राष्ट्रीय उपाध्यक्ष आणि अभिषेक बॅनर्जी यांना महासचिव बनवता येईल.



दरम्यान, ममता बॅनर्जी यांच्या निकटवर्ती सुष्मिता देव यांनी बुधवारी राज्यसभा खासदारकीचा राजीनामा दिला. त्यांच्या राजीनाम्यानंतर, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्यासोबतच्या त्यांच्या भेटीचा एक फोटो समोर आला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सुष्मिता भाजपमध्ये सामील होऊ शकतात. गेल्या तीन दिवसांत टीएमसीच्या २ राज्यसभा खासदारांनी राजीनामा दिला आहे. यापूर्वी, ८ जून रोजी सुखेंदू शेखर यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन पक्ष सोडला होता. सध्या टीएमसीचे लोकसभेत २८ आणि राज्यसभेत १३ खासदार आहेत. यापूर्वी, ३ जून रोजी बंगालच्या ८० आमदारांपैकी ५८ आमदारांनी ऋतब्रता बॅनर्जी यांना आपला नेता म्हणून नियुक्त करून एक वेगळा गट स्थापन केला होता.

**■ ममता बॅनर्जींकडे आता फक्त २२ आमदार आणि १९ खासदार**

टीएमसीचे लोकसभेत एकूण २८ खासदार होते, त्यापैकी २० जणांनी आता विद्रोही गट स्थापन केले आहेत. ममता बॅनर्जी यांचे आता लोकसभेत फक्त ८ खासदार उरले आहेत. राज्यसभेत १३ आमदारांपैकी दोघांनी राजीनामा दिल्याने, आता फक्त ११ राज्यसभा खासदार उरले आहेत. विधानसभेबद्दल बोलायचे झाल्यास, टीएमसीने या निवडणुकीत ८० जागा जिंकल्या. यापैकी ५८ आमदारांनी वेगवेगळे गट तयार केले आहेत. ममता बॅनर्जी यांचे फक्त २२ आमदार उरले आहेत.

## संपादकीय ......

# इंडिया आघाडी, बिनचेहर्‍याची की बिनबुडाची!

*आपापल्या महत्वाकांक्षांमुळे विस्कळीत झालेल्या इंडिया आघाडीने केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारविरोधात पुन्हा जमवाजमव करायला सुरुवात केली आहे. त्यासाठी त्यांची ८ जूनला दिल्लीत बैठक झाली. या आघाडीला इंडिया असे नाव देऊन आम्ही सगळा इंडिया मोदींच्या विरोधात उभा करू, असा आव त्यांनी वारंवार आणला असला तरी अजूनही या आघाडीला नीट उभेही राहता आले नाही, एकत्र चालणे तर दूरची गोष्ट, हे त्यांनी यापूर्वी वेळोवेळी दाखवून दिले आहे. त्यांना अजूनही या आघाडीसाठी चेहरा सापडत नाही, यामुळे ही इंडिया आघाडी बिनचेहर्‍याची आहे की, बिनबुडाची आहे, असे प्रश्न पडल्यावाचून राहत नाहीत.*

*पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सत्तेतून खाली खेचण्यासाठी अनेक विरोधी पक्षांनी एकत्र येऊन इंडिया आघाडीची स्थापना केली. भारतीय राजकारणात आघाड्यांचे प्रयोग नवे नाहीत. १९७७ मध्ये जनता पार्टी, १९९६ मध्ये संयुक्त आघाडी, १९९९ मध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडी, २००४ मध्ये संयुक्त पुरोगामी आघाडी. प्रत्येक वेळी आघाडीला एक चेहरा होता, एक आवाज होता, एक पंतप्रधानपदाचा उमेदवार होता. मोरारजी देसाई असोत, अटलबिहारी वाजपेयी असोत किंवा मनमोहन सिंग. मतदाराला स्पष्ट माहीत असायचं की सत्ता बदलली तर देशाची सूत्रे कोणाच्या हाती जाणार. पण २०२३ मध्ये स्थापन झालेली 'इंडिया' म्हणजे भारतीय राष्ट्रीय विकास समावेशक आघाडी या २३ पक्षांच्या आघाडीने मात्र हा संकेत मोडला. भाजपला रोखणे हा एकमेव समान कार्यक्रम ठेवून एकत्र आलेल्या या आघाडीने 'पंतप्रधान कोण' या प्रश्नाला बगल दिली.*

*'निवडणूक आधी जिंकू, नेता नंतर ठरवू' हे त्यांचे उत्तर होते. त्यामुळेच २०२४ ची लोकसभा निवडणूक आणि त्यानंतरच्या २ वर्षांत 'बिनचेहर्‍याची इंडिया आघाडी' ही टीका सतत झाली. चेहरा नसण्यामागे अनेक कारणे आहेत. आघाडीत काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष असला तरी २०१४ आणि २०१९ च्या पराभवानंतर त्याचा नैतिक दबदबा कमी झाला. राहुल गांधी यांच्या नेतृत्वावर ममता बॅनर्जी, अरविंद केजरीवाल, अखिलेश यादव यांचा पूर्ण विश्वास नाही. दुसरीकडे प्रत्येक प्रादेशिक पक्षाचा नेता स्वत:च्या राज्यात 'सर्वोच्च' आहे. ममता बॅनर्जी बंगालमध्ये, केजरीवाल दिल्ली आणि पंजाबमध्ये, तेजस्वी यादव बिहारमध्ये स्वत:ला पर्याय मानतात. या आघाडीतील एक घटक उद्धव ठाकरे हेदेखील पंतप्रधानपदाचा चेहरा जाहीर करावा, अशी सातत्याने मागणी करत आहेत.नितीश कुमार यांनी तर आघाडीच्या स्थापनेवेळीच पंतप्रधानपदाची इच्छा अप्रत्यक्षपणे बोलून दाखवली होती. या महत्त्वाकांक्षांच्या टकरीत कुणा एकाचे नाव पुढे करणे हे एक आव्हान आहे. त्यातून 'सामूहिक नेतृत्व' हा पळवाटेचा मार्ग निवडला गेला. इतिहास सांगतो की भारतीय मतदाराला आघाडी चालते, पण त्या आघाडीचा एक स्पष्ट चेहरा लागतो. १९७७ मध्ये इंदिरा गांधींच्या आणीबाणीला कंटाळलेल्या जनतेने जनता पार्टीला मते दिली, पण त्यांच्यासमोर मोरारजी देसाई, जगजीवन राम, चरण सिंग असे पर्याय होते. १९८९ मध्ये बोफोर्सचा मुद्दा होता, पण विश्वनाथ प्रताप सिंग यांची 'स्वच्छ प्रतिमा' निर्णायक ठरली. १९९६ ते १९९८ चा संयुक्त आघाडीचा प्रयोग हा बिनचेहर्‍याचा प्रयोग होता. हरदनहळ्ळी दुड्डेगौडा देवेगौडा आणि इंदरकुमार गुजराल पंतप्रधान झाले, पण सरकार २ वर्षांतच कोसळले. कारण जनतेने कोणाला कौल दिलाच नव्हता. स्थैर्यासाठी चेहरा लागतो हेच त्या प्रयोगाने दाखवून दिले. १९९९ नंतर अटलबिहारी वाजपेयी आणि २०१४ नंतर नरेंद्र मोदी यांच्या खंबीर प्रतिमेमुळे राष्ट्रीय लोकशाही आघाडीला सलग यश मिळाले.*

*२००४ मध्ये भाजपचा 'भारत चमकत आहे' फसला कारण त्याचवेळी काँग्रेसने मनमोहन सिंग यांचा स्वच्छ, अभ्यासू चेहरा आणि सोनिया गांधींचा त्याग समोर ठेवला. थोडक्यात, मुद्दा असो वा नसो, मतदार शेवटी व्यक्ती पाहतो. चेहरा नसल्याने इंडिया आघाडीचे मोठे नुकसान झाले. पहिले म्हणजे प्रचारातील गोंधळ. भाजपने संपूर्ण निवडणूक मोदींची हमी या एका मुद्द्यावर नेली. उलट इंडिया आघाडीचे २६ नेते २६ वेगवेगळ्या गोष्टी बोलत होते. 'आम्ही सत्तेत आल्यावर' या वाक्यानंतर कोणाचे नाव घ्यायचे हेच कार्यकर्त्यांना कळत नव्हते. दुसरे नुकसान म्हणजे जबाबदारीचे विसर्जन. सामूहिक नेतृत्वात यश सगळ्यांचे असते, पण अपयश कोणाचेच नसते. त्यामुळेच २०२४ च्या निकालानंतर आघाडीच्या बैठका जवळपास बंद झाल्या. महाराष्ट्रात महाविकास आघाडी, बंगालमध्ये तृणमूल, दिल्ली आणि पंजाबमध्ये आम आदमी पक्ष हे काँग्रेसशी जागावाटपावरून भांडत राहिले. जर एक सर्वमान्य चेहरा असता तर त्याचा एक शब्द अंतिम राहिला असता. तिसरे नुकसान म्हणजे धोरणातील संभ्रम. आर्थिक धोरण काय असेल? परराष्ट्र नीती कोण ठरवणार? संकट आल्यावर रात्री ३ वाजता निर्णय कोण घेणार? या प्रश्नांची उत्तरे मतदाराला मिळाली नाहीत.*

*बेरोजगारी, महागाई, संविधान, जातनिहाय जनगणना हे मुद्दे व्यक्तीपेक्षा मोठे आहेत, असा इंडिया आघाडीचा युक्तिवाद होता. भारतीय लोकशाही अजूनही व्यक्तिपूजक आहे. इथे मतदाराला 'राजा' कोण होणार हे आधी जाणून घ्यायचे असते. धोरणे नंतर समजून घेतली जातात. २०१४ मध्ये लोकांनी मोदींचे गुजरात प्रारूप नीट तपासले नव्हते, पण काहीतरी बदल होईल हा विश्वास मोदींच्या चेहर्‍यामुळे निर्माण झाला. २०२४ मध्ये इंडिया आघाडी तो विश्वास निर्माण करू शकली नाही. भविष्यात आघाडीसमोर तीन पर्याय आहेत. एक, काँग्रेसने मोठ्या मनाने प्रादेशिक नेत्यांपैकी कोणालातरी पंतप्रधानपदाचा चेहरा म्हणून स्वीकारावे. ममता बॅनर्जी यांच्याकडे आक्रमकता आहे, प्रशासनाचा अनुभव आहे. पण इतर प्रादेशिक पक्ष एका प्रादेशिक नेत्याला दिल्लीत मोठे होऊ देतील का, हा प्रश्न आहे. दुसरा पर्याय म्हणजे राहुल गांधी यांनाच एकमुखाने नेता घोषित करणे. पण त्यासाठी राहुल गांधी यांना 'अधूनमधून राजकारणी' ही प्रतिमा पुसावी लागेल. सतत जनतेत राहावे लागेल, प्रत्येक राज्यात संघटना बांधावी लागेल. २०२४ नंतर त्यांनी भारत जोडो न्याय यात्रा काढली, संसदेत आक्रमक भूमिका घेतली, पण ते पुरेसे आहे का? तिसरा पर्याय म्हणजे २०२९ साठी आतापासूनच नवा चेहरा तयार करणे. प्रियांका गांधी यांचा चेहरा आश्वासक आहे. इंडिया आघाडीच्या बैठकीत त्या उपस्थित असत्या तर फरक जाणवला असता, पण त्यांना परिघाच्या बाहेर ठेवण्यात येत आहे.*

*इंडिया आघाडीने हे लक्षात घ्यायला हवे की विरोधात राहणे आणि सत्तेचे स्वप्न पाहणे यात फरक असतो. विरोधासाठी २६ पक्ष एकत्र येऊ शकतात, पण सत्ता चालवण्यासाठी आदेश देणारे एक केंद्र लागते. केवळ 'मोदी नको' या नकारात्मक अजेंड्यावर आघाडी दीर्घकाळ टिकू शकत नाही. आघाडी म्हणजे अंकगणित नसून रसायनशास्त्र असते. २६ पक्षांचे २६ अहंकार एकत्र आले की त्यातून ऊर्जा नाही, स्फोट होतो. तो स्फोट टाळायचा असेल तर एक नियंत्रक लागतो. तो नियंत्रक म्हणजे चेहरा. जोपर्यंत इंडिया आघाडीला तो चेहरा सापडत नाही, तोपर्यंत ती 'बिनचेहर्‍याची' म्हणूनच ओळखली जाईल.*

# नगर परिषदेत 'टाईमपास' प्रशासन ?;

## सकाळी १०.३० वाजता अनेक विभाग ओस पडले

### कार्यालयीन वेळ सुरू होऊनही कर्मचारी अनुपस्थित; नागरिकांमध्ये नाराजी, शिस्तीवर प्रश्नचिन्ह

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०चांदूर रेल्वे :** शहरातील नागरिकांच्या दैनंदिन कामकाजाशी थेट संबंधित असलेल्या चांदूर रेल्वे नगर परिषदेत कार्यालयीन शिस्तीचा अभाव असल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. शासनाने निश्चित केलेल्या कार्यालयीन वेळेनुसार सकाळी ९.४५ वाजता कामकाज सुरू होणे अपेक्षित असतांना मंगळवारी (ता. ९) सकाळी १०.३० वाजताही अनेक विभागांमध्ये कर्मचारी अनुपस्थित असल्याचे दिसून आले. काही विभाग तर पूर्णपणे ओस पडलेले होते, तर अनेक ठिकाणी पंखे व दिवे सुरू असूनही कर्मचारी जागेवर नसल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.



महाराष्ट्र शासनाने प्रशासकीय कामकाज अधिक कार्यक्षम करण्यासाठी पाच दिवसांचा आठवडा लागू करत कार्यालयीन वेळ सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी निश्चित केली आहे. मात्र या नियमांचे पालन स्थानिक नगर परिषदेत कितपत होते, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. मंगळवारी सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास नगर परिषद कार्यालयाची पाहणी केली असता बांधकाम विभागात एकही कर्मचारी उपस्थित नसल्याचे आढळून आले. विभागातील कागदपत्रे, साहित्य अस्ताव्यस्त व अस्वच्छता असल्याचेही दिसून आले. पहिल्या मजल्यावरील राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान (एनयूएलएम) विभाग आणि लेखा विभागाचे दरवाजेही पूर्णपणे उघडलेले नव्हते. कर विभागातही कर्मचारी अनुपस्थित असल्याचे चित्र होते. इतर काही विभागांमध्ये केवळ एक-दोन कर्मचारी उपस्थित असल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे मुख्याधिकारी यांच्या दालनातील पंखे व दिवे सुरू असताना त्या स्वतः कार्यालयात उपस्थित नव्हत्या. त्यामुळे कार्यालयीन वेळेत वरिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत नागरिकांमध्ये चर्चा रंगली.

काही महिन्यांपूर्वी मुख्याधिकारी सुप्रिया टवलारे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर कार्यालयीन शिस्तीवर भर देण्यात आला होता. कर्मचारी वेळेवर येत असल्याचे चित्र निर्माण झाले होते. मात्र कालांतराने पुन्हा जुन्याच पद्धती सुरू झाल्याची भावना अनेक नागरिक व्यक्त करीत आहेत. काही अधिकारी - कर्मचारी हे बाहेरगावावरून येणे - जाणे करीत नियमांना तिलांजली देत आहे. नगर परिषदेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीवर प्रभावी नियंत्रण ठेवून कार्यालयीन वेळेचे काटेकोर पालन व्हावे, तसेच सर्वांनी मुख्यालयी राहून नियमितपणे नागरिकांना सेवा द्यावी, अशी मागणी शहरातील नागरिकांकडून होत आहे

# डीपीसीचा प्राप्त निधी वळता करण्यास नकार

## महापालिका आयुक्त व सार्वजनिक बांधकाम विभागात पत्रयुद्ध

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

जिल्हा नियोजन समितीकडून महापालिकेस मिळालेल्या निधीतून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आलेल्या कामांचे देयक काढण्यास मनपाने नकार दिला आहे. हा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वळता करणे अपेक्षित असताना त्यास नकार देण्यात येत असल्याने कंत्राटदारांची सुमारे पंधरा कोटी रुपयांची देयके थकली आहेत. विद्यमान आयुक्तांनी या कामांचा अहवाल सादर करण्याचे निर्देश देत निधी वळता केलेला नाही, असे सांगण्यात येत आहे. महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी पालकमंत्र्यांनी जिल्हा नियोजन समितीमधील नगरपरिषद संचालकांकडील शिल्लक निधी महापालिकेकडे वळता करण्याचे आदेश दिले होते.

त्यानुसार १५ कोटी रुपये महापालिकेकडे वळते करण्यात आले. या निधीचा विनियोग स्थानिक माजी नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी सुचविलेल्या विकासकामांवर खर्चण्याचे प्रस्तावित करण्यात येऊन त्यानुसार निधी वितरण करण्यात आला. सुचविण्यात आलेल्या कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग ही कार्यान्वयन यंत्रणा नियुक्त करण्यात आली. या निधीतून ७५ च्या जवळपास कामे प्रस्तावित करण्यात आलीत. त्यापैकी पाच कोटी रुपयांची २४ ते २५ कामे पूर्ण झाली असून सात कोटी रुपये किंमतीची कामे साठ टक्के झाली आहेत. उर्वरित निधीतील कामे निविदाप्रक्रियेत आहेत. पूर्ण झालेल्या कामांची देयके कंत्राटदारांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर केलीत. मात्र महापालिकेने निधीच वळता केला नसल्याचे कारण देत त्यांना फेटाळण्यात आले. तर दुसरीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून महापालिकेने निधी वळता करावा, यासाठी पत्रोत्तर करण्यात आले. त्यावर आयुक्तांनी मात्र आक्षेप घेत झालेल्या कामांचे अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. आयुक्तांकडून आतापर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागास पाच पत्रे देण्यात आली. प्रत्येक पत्राचे उत्तर देण्यात आल्यानंतर आता आयुक्तांनी सर्व कामांचे महापालिकेच्या उपअभियंत्यांकडून स्थळनिरीक्षण करण्यात येईल व नंतरच निधी वळण्याचा निर्णय घेण्यात येईल, असे म्हटल्याचे सांगण्यात आले. महापालिका व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यातील निधी वळता करण्यावरून निर्माण झालेल्या वादात लहान कंत्राटदार मात्र भरडल्या जाऊ लागले आहेत. महापालिकेने सार्वजनिक बांधकाम विभागास निधी वळता करणे अपेक्षित असताना आयुक्तांनी मात्र तो अडकवून ठेवल्याचा आरोप करण्यात येत आहे.

### आयुक्तांनी पाच पत्रे दिली

महापालिका आयुक्तांनी सार्वजनिक बांधकाम विभागास आतापर्यंत पाच पत्रे दिली आहेत. पहिल्या पत्रात जिल्हा नियोजन समितीमधून प्राप्त निधीतून किती कामे प्रस्तावित होती, ती यादी सादर करण्यास सांगितले. दुसऱ्या पत्रात यातील किती कामे पूर्ण झाली आहेत, ती माहिती सादर करा. तिसऱ्या पत्रात झालेल्या कामांच्या पूर्णत्वाचे प्रमाणपत्र जीओ टॅगिंगसह सादर करण्याचे निर्देश दिलेत. चौथ्या पत्रात कामांची सद्यस्थिती काय आहे, त्याचा अहवाल देण्यास सांगितले. यासर्व पत्रांची उत्तरे दिल्यानंतर पाचव्या पत्रात आयुक्तांनी महापालिकेचे उपअभियंते स्थळनिरीक्षण करतील व अहवाल सादर करतील, त्यानंतर बघू, असे कळवले असल्याचे सांगण्यात आले आहे.

# कौशल्य, शिस्त आणि स्वच्छतेचे कौतुक

## नगराध्यक्षांसह नगरसेवकांची नांदगाव आयटीआयला भेट

### विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी प्रवेश जनजागृतीचे आश्वासन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०नांदगाव खंडेश्वर**

कौशल्य विकासाच्या माध्यमातून युवकांना रोजगारक्षम बनविणाऱ्या नांदगाव खंडेश्वर येथील एकनाथराव रानडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे मंगळवारी दुपारी नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतच्या नगराध्यक्षांसह नगरसेवकांची भेट देत संस्थेच्या विविध विभागांची सविस्तर पाहणी केली. विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत प्रशिक्षणाच्या गुणवत्तेची माहिती घेतली तसेच संस्थेतील सुविधा, स्वच्छता आणि शैक्षणिक वातावरणाचे कौतुक केले.




नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर, उपाध्यक्षा शेख जमीर, गटनेते प्रकाश मारोटकर, आरोग्य सभापती ज्योत्स्ना धवसे, महिला व बालकल्याण सभापती कांता लोमटे, बांधकाम सभापती मोहम्मद रियाज यांच्यासह नगरसेवक शेख हारून, मोहम्मद साजिद व शेख सलाम यांनी संस्थेला भेट दिली. यावेळी प्राचार्य नंदनसिंह भुकवाल, प्रभारी प्राचार्य रा. भ. धोटे यांनी सर्वांचे स्वागत करून संस्थेच्या कार्याची माहिती दिली. सर्वांनी इलेक्ट्रिशियन, वायरमन, फिटर, कोपा, शीट मेटल वर्कर, वेल्डर, प्लंबर, बेसिक कॉस्मेटोलॉजी तसेच फॅशन डिझाईन अँड टेक्नॉलॉजी या विविध ट्रेड विभागांना भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्रशिक्षण पद्धती, उपलब्ध यंत्रसामग्री आणि रोजगाराच्या संधींबाबत माहिती जाणून घेतली. तसेच संपूर्ण आयटीआय परिसराची पाहणी करून विविध सुविधांचा आढावा घेतला. संस्थेतील स्वच्छता, शिस्तबद्ध वातावरण आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सोयी-सुविधांबाबत नगराध्यक्षांसह सर्व पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त करत प्रशंसा केली. सध्या आयटीआयची प्रवेश प्रक्रिया सुरू असून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या संस्थेत प्रवेश घ्यावा यासाठी जनजागृती करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याचे आश्वासनही यावेळी देण्यात आले. याप्रसंगी आयटीआयचे शिल्प निदेशक तुषार जैन, प्रफुल्ल कचरे, वैभव जाधव, निलेश देऊळकर, राम इखार, शहजाद खान, सुशील सरोदे, सागर डांगे, चिन्मय दहाट, वैभव केणे, प्रशांत पोच्ची, सचिन दुवदने, मयुरी वसुले, रुचिका डोरस, संगीता बिबेकर, दिपाली लोखंडे, रूपाली लांडे तसेच कार्यालयीन कर्मचारी निलेश खंडार, गौरव मोगरे व इतर उपस्थित होते.

# दिया येथील ग्रामसेवक एसीबीच्या जाळ्यात

### कारभाराची चौकशी करण्याची नागरिकांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

ग्रामपंचायतचे नाहरकत प्रमाणपत्र (एनओसी) देण्यासाठी दोन हजार रुपयांची मागणी केल्याप्रकरणी दिया ग्रामपंचायतचे ग्रामसेवक रामलाल बिसराम भिलावेकर यांच्यावर लाचलूचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) कारवाई केली आहे. या घटनेमुळे धारणी तालुक्यात चर्चेला उधाण आले असून संबंधित कारभाराची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, कडधान्य साठवणुकीसाठी गोदाम उभारण्याकरिता आवश्यक असलेले ग्रामपंचायतचे नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी तक्रारदाराकडे दोन हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीच्या पथकाने सापळा रचला. धारणी येथील सिव्हिल लाइन परिसरातील एका खासगी कार्यालयात रक्कम स्वीकारताना संबंधित ग्रामसेवकाला ताब्यात घेण्यात आले. या कारवाईनंतर काही ग्रामस्थांनी नाव न जाहीर करण्याच्या अटीवर ग्रामपंचायतच्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त केली. विविध प्रमाणपत्रे, परवानग्या, नाहरकत दाखले आणि इतर प्रशासकीय कामांसाठी नागरिकांना वारंवार फेऱ्या माराव्या लागत असल्याची तक्रार त्यांनी केली. विशेषतः दुर्गम व आदिवासी भागातील नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचेही त्यांनी सांगितले. स्थानिक स्तरावर ग्रामपंचायतच्या कामकाजाबाबत विविध चर्चा होत असल्या तरी संबंधित आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही. मात्र, एसीबीच्या कारवाईनंतर ग्रामपंचायतच्या एकूण कारभाराची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# अंजनगावसुर्जीच्या तहसीलदार पुष्पा सोळंखे यांनी दाखवला कर्तव्यदक्षतेचा आदर्श

## शेतरस्त्यांचे प्रश्न निकाली, अंजनगावसुर्जीत न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१० अंजनगावसुर्जी-** सार्वजनिक सुटीच्या दिवशीही प्रत्यक्ष शेतबांधावर जाऊन शेतकऱ्यांच्या प्रलंबित शेतरस्त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेत अंजनगावसुर्जीच्या तहसीलदार पुष्पा सोळंखे यांनी कर्तव्यदक्षतेचा आदर्श घालून दिला. चिंचोली शिंगणे येथे एका शेतकऱ्याने इतर शेतकऱ्यांचा वहिवाटीचा रस्ता अडविल्याने हे प्रकरण न्यायालयात गेले होते. न्यायालयाच्या आदेशानुसार शनिवारी तहसीलदार सोळंखे यांनी खल्लार पोलिसांच्या सहकार्याने प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन कारवाई केली. नायब तहसीलदार रवींद्र काळे, श्री. बमनोटे, संबंधित तलाठी आणि पोलिस बंदोबस्ताच्या उपस्थितीत अडविण्यात आलेला शेतरस्ता खुला करून देण्यात आला. दरम्यान, सोनगाव येथे शेतरस्त्याच्या वहिवाटीवरून दोन शेतकऱ्यांमध्ये सुरू असलेला दीर्घकालीन वादही तहसीलदार सोळंखे यांनी चर्चेच्या माध्यमातून मिटविला. दोन्ही पक्षांची बाजू ऐकून कायदेशीर बाबी समजावून सांगितल्यानंतर परस्पर सहमतीने रस्ता मोकळा करण्यात आला. त्यामुळे दोन्ही शेतकऱ्यांनी प्रशासनाचे आभार मानले. सुटीच्या दिवशीही प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून त्यांच्या समस्या सोडविण्याच्या तहसीलदार सोळंखे यांच्या कार्यपद्धतीचे तालुक्यात कौतुक होत आहे. त्यांच्या या पुढाकारामुळे अनेक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून प्रशासनाविषयीचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# खाकीतून गुटखा तस्करी! पोलीस जवानासह २.४७ लाखांचा मुद्देमाल जप्त

## शेंदूरजनाघाट पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

शहर पोलीस आयुक्तालयात कार्यरत एका पोलीस कर्मचाऱ्याला शेंदुरजनाघाट पोलिसांनी गुटखा तस्करी करताना रंगेहात पकडले. त्याच्या ताब्यातून २ लाख ४७ हजार ८० रुपयांचा गुटखा व स्विफ्ट डिझायर कार असा एकूण ४ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मंगळवारी (ता. नऊ) न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावल्याने पोलिसांनी त्याची कारागृहात रवानगी केली. पंकज सुधाकर दवंडे (रा. दत्त मंदिरजवळ, देवीनगर, बडनेरा) असे अटक पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे.

पोलिसांचे ब्रीदवाक्य सद्रक्षणाय खलनिग्रहणाय आहे आणि याचा अर्थ सज्जनांचे (चांगल्या लोकांचे) रक्षण करणे आणि दुर्जनांचा (गुन्हेगारांचा) नायनाट करणे आहे. समाजात कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिसांच्या खांद्यावर आहे. मात्र हे सर्व नियम व पोलिसांचे ब्रीदवाक्य पायदळी तुडवून शहर पोलीस आयुक्तालयातील आरसीपी फोर्समध्ये कार्यरत पोलीस कर्मचारी पंकज दवंडे याला चक्क गुटख्याची वाहतूक करताना ग्रामीण पोलिसांनी रंगेहात पकडले. ही कारवाई ७ जून रोजी मध्यरात्री शेंदूरजनाघाट पोलिसांनी पुसला ते पांढुर्णा मार्गावरील टोल नाक्यावर केली. रात्रीला टोलनाक्यावर पोलीस उपनिरीक्षक शेगोकार, पोलीस अंमलदार निलेश राउत मध्यप्रदेशातून येणाऱ्या प्रत्येक वाहनांची तपासणी करीत होते. दरम्यान कार क्र. एम.एच. २७ डी. १७३० मध्यप्रदेशातून येतांना दिसली. पोलिसांनी कार थांबवून पाहणी केली असता कारमध्ये प्रतिबंधीत वेगवेगळ्या प्रकारचा गुटखा आढळला. पोलिसांनी चौकशी केली. गुटख्याची वाहतूक करणारा पोलीस कर्मचारी असल्याने त्यांनी ठाणेदारांना माहिती दिली. त्यानंतर २ लाख ४७ हजार ८० रुपयांचा गुटखा व कार असा एकूण ४ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून अन्न व प्रशासन विभागाला माहिती दिली. दुसऱ्या दिवशी दुपारी अन्न सुरक्षा अधिकारी घनश्याम पंजाबराव दंदे ठाण्यात पोहचले. त्यांनी गुटख्याची पाहणी करून तक्रार दिली. त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा नोंदवून पोलीस कर्मचारी पंकज दवंडे याला अटक केली. तसेच मंगळवारी दुपारी न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावल्यामुळे पोलिसांनी त्याची कारागृहात रवानगी केली.पोलीस कर्मचाऱ्याला गुटखा तस्करी करतांना अटक केल्याची माहिती वाऱ्यासारखी पसरताच पोलीस दलात चांगलीच खळबळ उडाली आहे. पोलीस कर्मचारीच गुटख्याची अवैध वाहतूक करीत असल्यामुळे कोणाला जाब विचारावा, असा प्रश्न सर्व सामान्य नागरिकांच्या पुढे आहे.

### कारागृहात केली रवानगी

अमरावती शहर पोलीस दलात कार्यरत कर्मचारी पंकज दवंडे याला गुटख्याची अवैध वाहतूक करतांना अटक करण्यात आली. तसेच मंगळवारी त्याला न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यामुळे त्याची कारागृहात रवानगी केली आहे आणि संपूर्ण अहवाल वरिष्ठांना पाठविण्यात आला आहे.

– **शिवहरी सरोदे, ठाणेदार,** शेंदूरजनाघाट पोलीस स्टेशन.




# शालेय खरेदीचा खर्च वाढला; साहित्य दरात १५ टक्क्यांची वाढ

**वह्या, पुस्तके, पेन आणि दप्तर खरेदीसाठी बाजारात लगबग**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

नवीन शैक्षणिक वर्ष काही दिवसांवर येऊन ठेपले आहे. त्यामुळे बाजारपेठेमध्ये सध्या वह्या, पुस्तके, दप्तर आणि गणवेश खरेदीसाठी पालकांची मोठी लगबग आणि गर्दी पाहायला मिळत आहे. मात्र, यंदा महागाईचा मोठा फटका पालकांना बसत असून, गतवर्षीच्या तुलनेत शालेय साहित्याच्या दरामध्ये तब्बल १० ते १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. यामुळे सामान्य आणि मध्यमवर्गीय पालकांचे आर्थिक बजेट पूर्णपणे कोलमडले असून, शैक्षणिक खर्च हजारांच्या घरात पोहोचला आहे.





यंदा शहरातील बाजारात वह्या, पुस्तके, पेन आणि दप्तराच्या किमतींत थेट २० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. केवळ पहिली ते चौथीपर्यंतच्या मुलांच्या प्राथमिक शैक्षणिक साहित्याचा विचार केला, तरी पालकांना किमान ३ ते ५ हजार रुपयांचा खर्च करावा लागत आहे. गेल्या काही वर्षांपासून शैक्षणिक साहित्यातील नफा पाहून अनेक खासगी शाळांनी स्वतःचेच विक्री स्टॉल्स सुरू केले आहेत.

संबंधित शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना इतरत्र खरेदीचा पर्याय न ठेवता, याच अधिकृत स्टॉल्सवरून साहित्य घेण्याची सक्ती केली जात आहे. बाजार भावापेक्षा अधिक दर असलेल्या या शाळांच्या स्टॉल्समुळे एका विद्यार्थ्यांच्या केवळ नोटबुक, पुस्तके आणि गणवेशासाठी पालकांना तब्बल १० ते १५ हजार रुपये मोजावे लागत आहेत. पुढील काळातसाहित्य दरात वाढ होण्याची शक्यता विक्रेत्यांनी वर्तवली आहे.

### सक्ती करणाऱ्या शाळांवर होणार कारवाई

शाळा मराठी माध्यमाची असो वा इंग्रजी माध्यमाची, कोणत्याही शाळेला पालकांना त्याच विशिष्ट दुकानातून किंवा स्टॉलवरून साहित्य खरेदी करण्याची सक्ती करता येणार नाही. जर काही शाळांकडून अशी सक्ती केली जात असेल, तर पालकांनी आमच्याकडे थेट तक्रार करावी. आम्ही संबंधितांवर कडक कारवाई करू, असे आदेश शिक्षण विभागाने आधीच दिले आहे.–

### बाजारपेठेतील सरासरी खर्च

वह्या व पुस्तके – ३,००० ते ५,०००
शालेय दप्तर – ३५० ते १,५००
बूट आणि सॉक्स – ५०० ते १,०००
शालेय गणवेश – १,००० ते १,५००
इतर साहित्य – ५०० ते १,००० सरासरी १२ ते १५ हजार खर्च

### महागडी पुस्तके, युनिफॉर्मच्या फॅडमुळे बजेट कोलमडले

शासकीय किंवा अनुदानित शाळांमध्ये बालभारतीची पुस्तके अत्यंत माफक दरात मिळतात. याउलट, इंग्रजी शाळांमध्ये स्मार्ट लर्निंगच्या नावाखाली खासगी प्रकाशकांची महागडी पुस्तके सक्तीची केली जातात. केवळ पहिली ते चौथीच्या एका सेटची किंमत ३ ते ४ हजारांच्या घरात जाते. त्यातच नियमित युनिफॉर्म, स्पोर्ट्स युनिफॉर्म आणि हाऊस युनिफॉर्म अशा नवनवीन फॅडमुळे पालकांचे बजेट कोलमडले आहे.

# यवतमाळ मधील नगरसेवकांच्या हातात अक्षरशः निराशा

## 'हायहोल्टेज' लढत हवेत विरली; संधी हिरावल्याने नगरसेवकांमध्ये खदखद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०यवतमाळ**

विधान परिषद निवडणुक रंगणार अशी अपेक्षा असलेली राजकीय लढत बिनविरोधाच्या वळणावर संपली. मतदार असलेल्या नगरसेवकांच्या हातात अक्षरशः निराशाच आली.




निवडणुकीची घोषणा होताच नगरसेवकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. महायुती आणि महाविकास आघाडी आमनेसामने उभी ठाकल्याने चुरशीची निवडणूक होणार, अशी चर्चा रंगली होती. मात्र, उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या टप्प्यात पडद्यामागे वेगाने घडलेल्या राजकीय घडामोडींनी संपूर्ण चित्रच बदलून गेले. महाविकास आघाडीकडून साहेबराव कांबळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने निवडणुकीत रंगत निर्माण झाली होती. त्यात महायुतीतील उमेदवारीवरून सुरू असलेली ओढाताण पाहता तिरंगी लढतीचीही शक्यता व्यक्त होत होती. त्यामुळे प्रथमच मतदानाचा अधिकार बजावणार्!या अनेक नगरसेवकांनी निवडणुकीच्या तयारीलाही सुरवात केली होती. मात्र, नामांकन मागे घेण्याच्या शेवटच्या काही तासांत राजकीय समीकरणे झपाट्याने बदलली. महाविकास आघाडीचे उमेदवार साहेबराव कांबळे यांनी अचानक माघार घेतली आणि निवडणुकीतील रंगत क्षणात संपली. या निर्णयाने राजकीय वर्तुळासह नगरसेवकांनाही मोठा धक्का बसला. काँग्रेसने अपक्ष उमेदवार उभा करून निवडणूक लढविण्याचा शेवटपर्यंत प्रयत्न केल्याची चर्चा आहे. मात्र, अपक्ष उमेदवारांनीही माघार घेतल्याने विरोधकांचे सर्व डाव कोलमडले. दुसरीकडे महायुतीच्या अधिकृत उमेदवारीची घोषणा झाल्यानंतर भाजपकडून दाखल करण्यात आलेला अर्जही मागे घेण्यात आला. परिणामी शिंदेसेनेचे उमेदवार दृष्यंत चतुर्वेदी यांचा बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला. राजकीय आखाड्यातील या घडामोडींमुळे 'नेमके पडद्यामागे काय घडले?' हा प्रश्न आता मतदारांमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे. आघाडीचा उमेदवार कोण, निवडणूक कोणत्या मुद्द्यांवर लढली जाणार, हे समजण्याआधीच संपूर्ण प्रक्रिया संपुष्टात आल्याने अनेक नगरसेवकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

# '३, २, १... स्टार्ट?'ने जिंकला अद्वैत विदर्भ करंडक



## गणेश देशमुख सर्वोत्कृष्ट अभिनेता, तर डॉ. रसिका गोंधळे-तितरमारे सर्वोत्कृष्ट अभिनेत्री

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती–** अद्वैततर्फे आयोजित अद्वैत विदर्भ करंडक विदर्भस्तरीय मराठी खुली एकांकिका स्पर्धा नुकतीच पार पडली. रंगभूमी, नागपूर निर्मित '३, २ , १... स्टार्ट?', या एकांकिकेने प्रथम क्रमांक पटकावित अद्वैत विदर्भ करंडक पटकाविला. 'नामदेव पायरी'ने द्वितीय, तर 'कोप' या नाट्याने तृतीय पुरस्कार पटकाविला. लक्षवेधी एकांकिका अद्वैत विदर्भ करंडक 'चंद्रथ थिएटर्स, नागपूर द रोड शो' यांनी पटकविला. उद्घाटन व बक्षीस वितरण सोहळा, सिपना इंजिनिअरिंग कॉलेज येथील अरविंद लिमये नाट्यगृहात पार पडला. अमरावतीचे ज्येष्ठ रंगकर्मी व अध्यक्ष संजीवनी पुरोहित, नाट्य कलावंत किशोर कलोती व स्पर्धेचे परीक्षक नानाभाऊ मोरे, मृणाली टोपले आणि नाट्य कलावंत स्वाती तराळ यांच्या हस्ते झाला. एकदिवशीय रंगलेल्या या एकांकिका स्पर्धेत विदर्भातील एकूण १२ नाट्यसंस्था सहभागी झाल्या होत्या. ज्यामध्ये सर्वोत्कृष्ट एकांकिका अद्वैत विदर्भ करंडक २०२६ चा मान पटकविला तो रंगभूमी, नागपूर निर्मित '३, २ , १... स्टार्ट?' या एकांकिकेने. पार्श्वसंगीतात प्रथम पुरस्कार अजय हागे, भूमिका राऊत, गौरव राऊत, सुमित पाथ्रूड, द्वितीय स्थान साक्षी गव्हाणे, विशाल हाडगे, तर तृतीय पुरस्कार विजय सोनोने यांनी मिळविला. रंगभूषा प्रथम डॉ. स्वप्निल दांदडे, द्वितीय आदिती येवले, तृतीय दिव्या कवटकर, कुणाल पेद्दे, अभिनेत्री डॉ. रसिका गोंधळे-तितरमारे, द्वितीय शर्वरी ठाकरे, तृतीय ऊर्वी खडके, अभिनेता गटात प्रथम पुरस्कार गणेश देशमुख, द्वितीय क्रमांक यशवंत चोपडे, तर तृतीय पुरस्कार प्रणव कोरे यांनी पटकाविला. स्पर्धेचे परीक्षक नानाभाऊ मोरे, मृणाली टोपले, संजय भाकरे, रवींद्र कालेश्वरवार, पूनम डांगे यांचा सत्कार सदानंद बोरकर व राजेश वानखडे यांच्या हस्ते करण्यात आला. नटराज पूजन, मान्यवरांचे स्वागत, मनोगत झाल्यावर बक्षीस वितरण सोहळ्याला सुरवात झाली. संचालन विशाल तराळ यांनी केले. आभार संजीवनी पुरोहित यांनी मानले.

# वादळवाऱ्यामुळे निंबोरा बोडखा येथे १३ घरांचे नुकसान

## सहायक गटविकास अधिकारी योगेश वानखडे यांनी केली गावात पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०धा. रेल्वे**

तालुक्यातील निंबोरा बोडखा येथे सात जून रोजी झालेल्या वादळवाऱ्यामुळे गावातील १३ घरांचे व गुरांच्या गोठ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. नुकसानग्रस्त नागरिकांना दिलासा देण्यासाठी आणि नुकसानीचा आढावा घेण्यासाठी सोमवारला (ता. आठ) प्रशासनातर्फे सहायक गटविकास अधिकारी यांनी योगेश वानखडे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी पंचायत समिती धामणगावरेल्वेचे सहायक गटविकास अधिकारी योगेश वानखडे, सरपंच सचिन बमबोटे, ग्रामपंचायत अधिकारी किशोरी पारेकर, संगणक परिचालक श्रीकांत मते, गावातील कोतवाल तसेच ग्रामपंचायत कर्मचारी जगदीश गेटमे उपस्थित होते. प्राथमिक पाहणीनुसार गावातील १३ कुटुंबांचे नुकसान झाले असून त्यामध्ये १० घरे व ३ गुरांचे गोठे बाधित झाले आहेत. यापैकी दोन



घरांचे अंशतः नुकसान झाले असून उर्वरित घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती देण्यात आली. नुकसानीचे अचूक मूल्यांकन करण्यासाठी ग्रामपंचायत अधिकारी व तलाठी यांच्यामार्फत पंचनामा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच नुकसानग्रस्त मालमत्तांचे जिओ-टॅग फोटो व आवश्यक माहिती तातडीने सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तयार करण्यात येणार असून नुकसानग्रस्तांना लवकरात लवकर मदत मिळावी, यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची बोरगाव धर्माळे येथे सदिच्छा भेट

## धर्माळे कुटुंबीयांशी संवाद; सामाजिक कार्यासाठी दिल्या शुभेच्छा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१० बो.धर्माळे** फोटोबोरगाव धर्माळे येथे राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ८ जून २०२६ रोजी धर्माळे कुटुंबाच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देत आपुलकीचा परिचय दिला. ग्रामीण भागातील एका सामान्य कार्यकर्त्याच्या घरी मंत्री महोदयांनी स्वतः भेट दिल्याने कुटुंबीयांसह गावकऱ्यांमध्ये प्रचंड आनंदाचे वातावरण निर्माण झाले.यावेळी पुंडलिकराव धर्माळे, मंदाताई धर्माळे, रुशाली धर्माळे, श्रावणी, समीर धर्माळे तसेच कुटुंबातील अन्य सदस्यांची मंत्री महोदयांनी आस्थेने भेट घेत त्यांना शुभेच्छा दिल्या. धर्माळे कुटुंबाच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.या स्नेहपूर्ण भेटीदरम्यान विविध सामाजिक विषयांवर चर्चा झाली. मंत्री महोदयांच्या मार्गदर्शनामुळे सामाजिक कार्यासाठी नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाल्याची भावना धर्माळे कुटुंबीयांनी व्यक्त केली. ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांच्या घरी येऊन दिलेल्या या सदिच्छा



भेटीबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख आशिष धर्माळे यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे मनःपूर्वक आभार मानले.–

# बळीराजाला लागली दमदार पावसाची प्रतीक्षा

## नजरा आकाशाकडे; जिल्ह्यात खरीपाच्या पेरणीची सर्व तयारी पूर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

खरीप हंगामाच्या आगमनाची चाहूल लागताच शिवारात नवचैतन्य संचारले असून काळ्या मातीत कष्टांचे सोने पेरण्यासाठी बळीराजा पूर्ण तयारीनिशी सज्ज झाला आहे. शेतातील मशागतीची सर्व कामे पूर्ण झाली असून अनेक शेतकर्!यांनी ट्रॅक्टरवर पेरणी यंत्रे उभारून ठेवली आहेत. वाढलेल्या दरातील बियाणे, खते आणि इतर आवश्यक साहित्याची जुळवाजुळव पूर्ण झाली तरी शेतकर्!यांच्या नजरा आता आकाशाकडे खिळल्या आहेत. प्रतीक्षा आहे ती केवळ दमदार, समाधानकारक आणि पेरणीयोग्य पावसाची. गत काही वर्षांत अपुर्!या, खंडित किंवा अनियमित पावसामुळे अनेक शेतकर्!यांना दुबार-तिबार पेरणीचे संकट सहन करावे लागले. अतिरिक्त खर्च, उत्पादनात घट आणि आर्थिक फटका यामुळे शेतकर्!यांचे कंबरडे मोडले. त्यामुळे यंदा घाईघाईने पेरणी न करता पुरेसा व स्थिर पाऊस झाल्यानंतरच शेतात बीज टाकण्याचा सल्ला कृषी तज्ज्ञांकडून दिला जात आहे.

शेतकरी पुन्हा संकटात सापडू नये यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील समाधानकारक पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये, असे आवाहन केल्यामुळे सर्व तयारी पूर्ण असूनही बळीराजा संयम बाळगत आहे. 'ये रे ये रे पावसा, तुला देतो पैसा' ही बालगीताची ओळ जणू बळीराजाच्या ओठांवर पुन्हा एकदा उमटताना दिसत आहे. काळ्या ढगांची चाहूल लागली की



शेतकर्!यांच्या मनात आशेचे नवे अंकुर फुटू लागतात. अंगणात सज्ज उभे असलेले ट्रॅक्टर, त्यावर बसविण्यात आलेली पेरणी यंत्रे आणि आकाशाकडे लागलेल्या आशावादी नजरा हे ग्रामीण भागातील सध्याचे बोलके चित्र बनले आहे. यंदाच्या खरीप हंगामाकडून शेतकर्!यांना मोठ्या अपेक्षा आहेत. अवकाळी पाऊस, दुष्काळ, अतिवृष्टी, कीडरोग आणि शेतीमालाच्या अस्थिर बाजारभावांमुळे मागील काही वर्षे शेतकर्!यांसाठी अत्यंत कठीण ठरली. त्यामुळे यंदाचा हंगाम भरघोस, समृद्ध आणि दिलासा देणारा ठरावा, अशी प्रार्थना प्रत्येक शेतकरी करीत आहे. पहिल्याच योग्य पावसात केलेली अचूक पेरणी हीच भरघोस उत्पादनाची पहिली पायरी मानली जाते. सध्या संपूर्ण कृषी क्षेत्राचे लक्ष मॉन्सूनच्या प्रगतीकडे लागले आहे. वातावरणात ढगांची गर्दी वाढत असली तरी अनेक भागांत अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही.

# स्वीकृत नगरसेवक नियुक्तीविरोधातील याचिका न्यायालयाने फेटाळली

## मोर्शी नगरपरिषदेतील नियुक्ती प्रक्रिया नियमबद्ध असल्याचे स्पष्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मोर्शी–** : मोर्शी नगरपरिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या कोट्यातून झालेले स्वीकृत नगरसेवक सतीश डफडे यांच्या नियुक्तीविरोधात दाखल करण्यात आलेली याचिका न्यायालयाने फेटाळून लावली आहे. २५ मार्च २०२४ रोजी नगराध्यक्ष प्रतीक्षा गुल्हाने यांनी नगरपरिषद नियमावलीनुसार निवड प्रक्रिया राबवून, जिल्हाधिकारी अमरावती यांच्या आदेश व देखरेखीखाली सतीश डफडे यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून नियुक्ती केली होती. मात्र, ही नियुक्ती नियमबाह्य असल्याचा दावा करीत ॲड. जयंत वसंतराव ढोले यांनी जिल्हा न्यायालयात नगराध्यक्ष प्रतीक्षा गुल्हाने, जिल्हाधिकारी अमरावती आणि मोर्शी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याविरोधात याचिका दाखल केली होती. याप्रकरणाची सुनावणी पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद आणि सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांचा अभ्यास करून याचिका फेटाळून लावली. तसेच खटल्यामुळे संबंधितांना झालेला खर्चही परत करण्याचे निर्देश दिल्याची माहिती मिळाली आहे.

न्यायालयाच्या निर्णयानंतर नगराध्यक्ष प्रतीक्षा गुल्हाने आणि स्वीकृत नगरसेवक सतीश डफडे यांनी समाधान व्यक्त केले. त्यांच्या बाजूने ॲड. अरुण बेहेरे तसेच सरकारी वकील ॲड. घोडेस्वार यांनी बाजू मांडली. या निर्णयामुळे स्वीकृत सदस्य नियुक्तीची प्रक्रिया नियमबद्ध आणि कायदेशीर असल्याचे स्पष्ट झाल्याची प्रतिक्रिया संबंधितांकडून व्यक्त करण्यात आली आहे.

# विधान परिषद निवडणुकीत धक्कादायक घडामोड

## काँग्रेसचे हर्षजीत देशमुख रुग्णालयात दाखल !

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती** विधान परिषद निवडणुकीच्या सुरू असलेल्या घडामोडींदरम्यान आणखी एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. प्राप्त माहितीनुसार, अमरावती विधान परिषद निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार हर्षजीत देशमुख यांना मंगळवारी अचानक नागपूरमधील एका मोठ्या खासगी रुग्णालयात अँजिओप्लास्टी शस्त्रक्रियेसाठी दाखल करण्यात आले आहे. यामुळे महाविकास आघाडी आणि काँग्रेसच्या नेत्यांमध्ये चिंता पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हर्षजीत देशमुख यांना मंगळवार, ९ जून रोजी नागपूरमधील डॉ. प्रशांत जगताप यांच्या प्रसिद्ध वेदांत रुग्णालयात अचानक दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मात्र, निवडणुकीच्या वेळी त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.



अमरावती शहरातील एका वरिष्ठ काँग्रेस नेत्याने नाव न छापण्याच्या अटीवर हर्षजीत देशमुख रुग्णालयात दाखल झाल्याची अधिकृत पुष्टी केली आहे. निवडणुकीच्या अगदी आधी असे काय घडले की महाविकास आघाडीचे उमेदवार हर्षजीत देशमुख यांना शस्त्रक्रियेसाठी नागपूरच्या रुग्णालयात दाखल करावेलागले, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

अँजिओप्लास्टी शस्त्रक्रियेनंतर डॉक्टरांना उमेदवाराला किमान आठ दिवस विश्रांतीसाठी द्यावे लागते. परिणामी, महाविकास आघाडीचे नेते आता महत्त्वपूर्ण आगामी विधान परिषदनिवडणुकीदरम्यान महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवाराच्या मैदानातील अनुपस्थितीबद्दल चिंतेत आहेत. विधान परिषद निवडणुकीसाठी १८ जून रोजी मतदान होणार असून, निवडणूक प्रक्रियेसाठी केवळ आठ दिवस शिल्लक आहेत.

### तळागाळातील प्रचारातून माघार

हे लक्षात घेण्यासारखे आहे की, गेल्या मंगळवारी जेव्हा विप्लव बाजोरियायांनीसर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली, तेव्हा न्यायालयानेच हस्तक्षेप करण्यास नकार दिला. परिणामी, ज्या अपक्ष उमेदवाराची उमेदवारी नाकारण्यात आली होती, त्या बाजोरिया यांनी आपली याचिका मागे घेतली, ज्यामुळे एक उमेदवार रिंगणातून बाहेर पडला. आता केवळ भाजपचे उमेदवार प्रवीण पोटे, बहुजन वंचित आघाडीचे डॉ. निलेश विश्वकर्मा आणि महा विकास आघाडीचे हर्षजीत देशमुख हेच निवडणुकीच्या रिगणात उरले होते. तथापि, मंगळवारी, उर्वरित तीन उमेदवारांपैकी दुसरे उमेदवार, देशमुख, प्रकृती अस्वास्थ्यामुळे रुग्णालयात दाखल झाले, त्यामुळे तळागाळातील प्रचारासाठी रिगणात फक्त दोनच उमेदवार उरले. थोडक्यात सांगायचे झाल्यास, ही लढत आता पोटे आणि विश्वकर्मा यांच्यात थेट होऊ शकते. असे झाल्यास, आज प्रवीण पोटे यांचा एकतर्फी विजय निश्चित आहे.

# विप्लव बाजोरिया यांची सर्वोच्च न्यायालयातील याचिका मागे

## आता पुन्हा उच्च न्यायालयात लढणार

विदर्भ प्रजासत्ताकदि.१०अमरावती ५१ विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज बाद ठरलेल्या विप्लव बाजोरिया यांना सर्वो च्च न्यायालयातून दिलासा मिळाला नाही. सर्वोच्च न्यायालयाने याचिका सुनावणीयोग्य नसल्याचे स्पष्ट करत आधी उच्च न्यायालयातील प्रक्रिया पूर्ण करण्याचा सल्ला दिल्यानंतर बाजोरिया यांनी आपली विशेष अनुमति याचिका (एसएलपी) मागे घेतली.



### लढाई अखेरपर्यंत सुरू राहणार

आमची न्यायालयीन लढाई अजून संपलेली नाही. आम्ही अखेरच्या क्षणापर्यंत कायदेशीर लढा सुरू ठेवणार आहोत. निवडणूक प्रक्रिया थांबविण्याची मागणी नसून, १७ जूनपूर्वी सुनावणी घेण्यात यावी तसेच विप्लव बाजोरिया यांना निवडणुकीत सहभागी होण्याची संधी द्यावी, अशी विनंती उच्च न्यायालयाकडे करण्यात येणार आहे. ही लढाई अर्ध्यावर सोडणार नाही.

**गोपिकिशन बाजोरिया,माजी आमदार.**

अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून अकोल्याचे शिंदे सेनेचे बंडखोर उमेदवार विप्लव बाजोरिया यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र, इतर उमेदवारांनी घेतलेल्या आक्षेपांनंतर छाननी प्रक्रियेदरम्यान जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांचा अर्ज बादठरविला होता. या निर्णयाविरोधात बाजोरिया यांनी नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती.मात्र, उच्च न्यायालयाने तातडीचा दिलासा देण्यास नकार देत सुनावणी १७ जून रोजी निश्चित केली. यानंतर बाजोरिया यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेत स्पेशल लिव्ह पिटीशन दाखल केली होती. या याचिकेवर मंगळवारी सुनावणी झाली. न्यायमूर्ती पी. के. मिश्रा यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत न्यायालयाने ही याचिका ग्राह्य धरता येणार नसल्याचे मत व्यक्त केले.याचिका मागे घ्या, अन्यथा ती फेटाळून लावण्यात येईल, असे न्यायालयाने स्पष्ट केल्याने बाजोरिया यांनी याचिका मागे घेण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने ती निकाली काढली. या प्रकरणात प्रवीण पोटे यांनी कॅव्हेट दाखल केले होते. त्यांच्या वतीने ॲड. श्रेयस ललित यांनी बाजू मांडली.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत ‘कोट्यवधींचा व्यवहार’

## यशोमती ठाकूर यांचे गंभीर आरोप

### हर्षजित देशमुख ‘मॅनेज’ झाल्याची चर्चा; घोडेबाजारामुळे निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**



अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार हर्षजित देशमुख यांच्याबाबत गंभीर आरोप समोर आले आहेत. काँग्रेस नेत्या यशोमती ठाकुर यांनी देशमुख हे कोट्यवधी रुपये घेऊन ‘मॅनेज’ झाल्याची चर्चा सुरू असल्याचा दावा केला आहे.माध्यमांशी बोलताना ठाकूर म्हणाल्या की, अमरावतीचा उमेदवार मॅनेज झाल्यासारखा दिसत आहे. त्यांनी १५ ते २० कोटी रुपये घेतल्याची चर्चा सुरू आहे. आज आम्हाला माहिती मिळाली की ते एका खासगी रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये आहेत आणि तेथूनच मुलाखती देत आहेत. ही अत्यंत संतापजनक बाब आहे.यशोमती ठाकूर यांनी या प्रकरणात मोठ्या आर्थिक व्यवहाराचा संशय व्यक्त करत राज्य सरकारवरही प्रश्न उपस्थित केले. जर कोट्यवधी रुपयांचा व्यवहार होत असेल आणि एवढी मोठी रोकड इकडून तिकडे जात असेल, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय करत आहेत? असा सवाल त्यांनी केला.यावेळी त्यांनी हेमंत पाटील यांच्या वक्तव्यालाही दुजोरा देत, ही निवडणूक आता सामान्य कार्यकर्त्यांची राहिलेली नाही. संपूर्ण घोडेबाजार सुरू असून निवडणूक प्रक्रिया भ्रष्ट होत आहे. आम्ही याचा तीव्र निषेध करतो, असे सांगितले.

### बिनविरोध निवडणूक झाल्यास नगरसेवकांचा मतदानाचा अधिकार हिरावला जाईल – निलेश विश्वकर्मा

विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे विधान परिषद उमेदवार निलेश विश्वकर्मा यांनी भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. मी अद्याप यशोमती ठाकूर यांची क्लिप ऐकलेली नाही, मात्र त्यात तथ्य असेल तर हा अत्यंत गंभीर विषय आहे, असे त्यांनी म्हटले. भाजप सत्तेच्या जोरावर निवडणुका लढवत असून नगरसेवकांवर दबाव टाकला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. निवडणूक बिनविरोध झाल्यास नगरसेवकांचा मतदानाचा अधिकार हिरावला जाईल, असे सांगत नगरसेवकांना पैशांचे आमिष दाखवून घोडेबाजार सुरू असल्याचा दावा विश्वकर्मा यांनी केला. या प्रकरणाची सखोल चौकशी होण्याची मागणीही त्यांनी केली.

# ४९८ ग्रामपंचायतींच्या सदस्य आरक्षणाची सोडत जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१० अमरावती–** राज्यातील बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४ आणि २०२५ मध्ये मुदत संपलेल्या, तसेच सन २०२६ च्या कालावधीत मुदत संपणाऱ्या नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जिल्ह्यातील ४९८ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सदस्यांच्या आरक्षण निश्चितीचा आणि आरक्षण फिरवण्याचा कार्यक्रम अधिकृतपणे जाहीर करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील तालुक्यांतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम १० ते १२ जून २०२६ या तीन दिवसांच्या कालावधीत राबविला जाणार आहे. नागरिकांनी आरक्षण सोडतीला उपस्थित राहावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार यांनी केले आहे.–

# हवामान तज्ज्ञांच्या चुकीच्या अंदाजामुळे

## संत्रा उत्पादक शेतकरी संकटात!

### मृग बहरासाठी ताणावर सोडलेली संत्रा झाडे सुकण्याच्या मार्गावर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०मोर्शी**



फोटो घेणेयावर्षी मृग बहराच्या नियोजनासाठी अनेक संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केलेल्या लवकर पावसाच्या अंदाजावर विश्वास ठेवून आपल्या संत्रा बागांना ताण दिला. मात्र अपेक्षित पाऊस न झाल्याने आता ताणावर सोडलेली संत्रा झाडे सुकण्याच्या मार्गावर असून हजारो शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.संत्रा उत्पादनात मृग बहराचे विशेष महत्त्व असते. बहर चांगला येण्यासाठी शेतकरी काही काळ झाडांना पाणी देणे बंद करून ताण देतात. त्यानंतर पावसाच्या आगमनानुसार सिंचन व व्यवस्थापनाचे नियोजन केले जाते. यंदा हवामान तज्ज्ञांनी लवकर मान्सून दाखल होण्याचा अंदाज व्यक्त केल्याने अनेक शेतकऱ्यांनी त्यानुसार निर्णय घेतला. मात्र प्रत्यक्षात पावसाने दडी मारल्याने संत्रा बागांपुढे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.वेळेवर पाऊस न पडल्यामुळे झाडांवरील ताण वाढत असून पाने गळणे, फांद्या वाळणे आणि बहरावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अनेक शेतकऱ्यांना आता पुन्हा सिंचनासाठी अतिरिक्त खर्च करावा लागत असून वीज, मजुरी आणि इंधन खर्चातही वाढ झाली आहे.शेतकरी सांगतात की, हवामान अंदाजाच्या आधारे घेतलेले निर्णय चुकीचे ठरल्याने संत्रा उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. आधीच उत्पादन खर्च वाढलेला असताना अशा परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.कृषी क्षेत्रातील जाणकारांच्या मते, हवामान अंदाज देताना स्थानिक परिस्थिती आणि संभाव्य बदल याबाबत अधिक अचूक माहिती देणे आवश्यक आहे. चुकीच्या अंदाजाचा सर्वाधिक फटका फळबाग उत्पादकांना बसत असून त्यासाठी स्वतंत्र मार्गदर्शन यंत्रणा उभी करून कृषी विभागाने संत्रा बागा वाचविण्यासाठी तातडीने मार्गदर्शन करावे अशी मागणी संत्रा उत्पादक शेतकरी रुपेश वाळके यांनी केली आहे. हवामान तज्ज्ञांच्या अंदाजावर विश्वास ठेवून मृग बहराचे नियोजन केले, पण पावसाने पाठ फिरवल्याने आता संत्रा बागा वाचविण्याचे मोठे आव्हान संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसमोर उभे राहिले आहे, अशी खंत संत्रा उत्पादक शेतकरी व्यक्त करीत आहेत.

# विहिरीचे साहित्य चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश; सहा जणांना अटक

### वाहनासह मुद्देमाल जप्तखोलापूर पोलिसांची कारवाई; ६० हजारांचा चोरीचा माल हस्तगत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० अमरावती** बोरखडी बुद्रुक येथील विहीर बांधकामासाठी वापरण्यात येणारे लोखंडी साहित्य चोरणाऱ्या टोळीचा खोलापूर पोलिसांनी पर्दाफाश करत सहा आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत चोरीचा संपूर्ण मुद्देमाल तसेच गुन्ह्यात वापरलेले वाहन जप्त करण्यात आले.फिर्यादी दामोदर अण्णाजी पवार (वय ६६, रा. बोरखडी बुद्रुक) हे विहीर खोदण्याचे व बांधण्याचे काम करतात. त्यांनी बोरखडी खुर्द येथील सुरज शरदराव राऊत यांच्या शेतात विहीर खोदण्याचे काम घेतले होते. ५ जून २०२६ रोजी काम तात्पुरते बंद करून त्यांनी साहित्य शेतात सुरक्षित ठेवले होते. मात्र ८ जून रोजी सकाळी शेतात गेल्यावर २० लोखंडी तराफे व दोन लोखंडी सिमेंट कालवण्याचे टप असा एकूण ६० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे निदर्शनास आले.



याप्रकरणी खोलापूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार तपास सुरू करण्यात आला. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी बोरखडी बुद्रुक येथील संशयितांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. आरोपींनी चोरीचे साहित्य टाटा २०७ (एमएच ०४ एफपी ०५२०) वाहनातून खोलापूर येथील भंगार बाजारात विकल्याचे सांगितले.या प्रकरणात अनिल रामचंद सोळंके, दिवाकर सुरेश सोळंके, प्रशांत नामदेवराव चव्हाण, उमर खान साहेब खान, अमीन खान बने खान व वाहन चालक प्रथमेश संजय कुंभेकर यांना अटक करण्यात आली. पोलिसांनी २० लोखंडी तराफे, दोन लोखंडी टप तसेच गुन्ह्यात वापरलेले टाटा २०७ वाहन जप्त केले आहे.ही कारवाई अप्पर पोलीस अधीक्षक तोटेवाड व उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली खोलापूर पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा २७ वा वर्धापन दिन साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २७ वा वर्धापन दिन आमदार सौ. सुलभाताई खोडके यांच्या रेल्वे स्टेशन चौक येथील जनसंपर्क कार्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पक्षाला गतवैभव प्राप्त करून देत सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या बळावर नव्या उंचीवर नेण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात पक्षाचे प्रेरणास्थान दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर पक्षध्वजाचे ध्वजारोहण करून मानवंदना देण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या २७ वर्षांच्या



प्रवासाचा गौरव करत महाराष्ट्राच्या विकासात, शेतकरी, युवक आणि सामाजिक न्यायासाठी पक्षाच्या योगदानाचा गौरव करण्यात आला.राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्ष अधिक बळकट करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे आणि प्रदेश महासचिव आमदार संजय खोडके यांच्या मार्गदर्शनाचा उल्लेखही करण्यात आला.यावेळी श्री. यश सुलभा संजय खोडके यांनी कार्यकर्त्यांचे आभार मानत वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला शहरातील महिला आघाडी, युवक, युवती, विद्यार्थी, किसान, अल्पसंख्यांक, शिक्षक, क्रीडा, सांस्कृतिक व विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेरपिंगळाई परिसरात शेतीसाहित्य चोरीच्या घटनांमध्ये झाली वाढ

### एकाच रात्री तीन मोटारपंप व विद्युत केबल लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११नेरपिंगळाई**

नेरपिंगळाई परिसरात शेतीसाहित्य चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असून शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आठ जूनच्या मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी चार शेतांवर डल्ला मारत तीन मोटार पंप आणि एक विद्युत केबल चोरी करून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले असून चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शेतकरी मयूर सुकलकर, मयूर राऊत आणि राजेंद्र राऊत यांच्या शेतातील सिंचनासाठी वापरण्यात येणारे मोटार पंप अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत चोरी करून नेले. तसेच नरेंद्र टाकळे यांच्या शेतातील विद्युत केबलही चोरट्यांनी लंपास केली. विशेष म्हणजे या सर्व घटना एकाच रात्री घडल्याने चोरट्यांनी पूर्वनियोजित पद्धतीने परिसराला लक्ष्य केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

खरीप हंगामाची तयारी सुरू असताना सिंचनासाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले साहित्य चोरीला गेल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. वाढता शेती खर्च, खतांची उपलब्धता, मजुरीचा प्रश्न आणि अनियमित पावसामुळे आधीच शेतकरी अडचणीत असताना या चोऱ्यांमुळे त्यांच्या समस्यांमध्ये आणखी भर पडली आहे. विशेष म्हणजे, ही परिसरातील पहिली चोरीची घटना नाही. यापूर्वीही अनेक शेतकऱ्यांच्या शेतातून स्प्रिंक्लर नोझल, पीव्हीसी पाइप, वीजकेबल आणि इतर सिंचन साहित्य चोरीला गेल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे शेतकरी वर्गात असुरक्षिततेची भावना वाढत असून चोरट्यांवर अद्याप प्रभावी कारवाई न झाल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

रात्रीची गस्त वाढवावी पोलिस प्रशासनाने रात्रीची गस्त वाढवावी तसेच चोरीच्या घटनांवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याची गरज आहे. शेती हेच उपजीविकेचे प्रमुख साधन असताना अशाप्रकारच्या चोऱ्यांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडत असल्याने आरोपींना तातडीने जेरबंद करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.